




दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | बुधवार १३ नोव्हेंबर २०२४ | अंक ३३९ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# नरीमन पॉईंट ते विरार प्रवास रस्ते मार्गाने केवळ ४० मिनिटांत: देवेंद्र फडणवीस यांची मोठी घोषणा

**मुंबई प्रतिनिधी**

मुंबई आणि नवी मुंबई रस्ते मार्गाने प्रवास करणे मोठे दिव्यच असते. सध्या या प्रवासासाठी दीड ते दोन तासांचा वेळ जातो. परंतु राज्यात समृद्धी महामार्ग साकारणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांनी दोन भागांना जलदगतीने मार्गाने जोडण्याचा प्लॅन सांगितला. नरीमन पॉईंट ते विरार प्रवास रस्ते मार्गाने केवळ ४० मिनिटांत होणार असल्याचे देवेंद्र फडणीस यांनी नवी मुंबईतील प्रचार सभेत बोलताना सांगितले. 'कोस्टल रोड' चा विस्तार भयंदर, विरार पालघरपर्यंत करण्यात येणार आहे. त्यासाठी जपान सरकार



40 हजार कोटी कर्ज देणार आहे, असे फडणवीस यांनी मंगळवारी सांगितले. मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांना शेतीचा दर्जा दिला. महायुती सरकारने शेतकऱ्यांसाठी अनेक योजना आणल्या आहेत. आपले सरकार आल्यावर 15 हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. तसेच शेती पंपासाठी बिल भरायची गरज राहणार नाही. त्यांचे वीज बिल सरकार भरणार आहे. त्यासाठी सरकारने नवीन वीज पुरवठा कंपनी तयार केली आहे. त्याचे काम 18 महिन्यांत पूर्ण होईल. त्यानंतर शेतकऱ्यांना 365 दिवस वीज मिळणार आहे. तसेच आपले सरकार आल्यावर पूर्ण कर्ज माफी करू, अशी घोषणाही फडणवीस यांनी केली.

## काय म्हणाले फडणवीस

नरीमन पॉईंट ते विरार प्रवास ४० मिनिटांत करता येणार आहे. या ठिकाणी कोस्टल रोडचे काम सुरु होत आहे. त्यासाठी जपान सरकारकडून ५४ हजार कोटी मिळणार आहेत. तसेच नवी मुंबईत वाढवण बंदर होत आहे. त्यामुळे या भागांचा मोठा विकास होणार आहे. नवीन रस्ते होत आहे. आता या ठिकाणी विमानतळ आले तर या भागाचे चित्र बदलणार आहे. या विमानतळासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सकारात्मक पाऊल उचलणार असल्याचे जाहीर केले. या ठिकाणी होणाऱ्या वाढवण बंदरामुळे कोळी बंधू समृद्ध होतील. नरेंद्र मोदी यांनी निल क्रांती योजना आणली. त्यामुळे कोळी बांधवांना कर्ज मिळू लागले. मासेमारी करणाऱ्यांच्या जीवनात बदल होऊ लागले, असे फडणवीस यांनी सांगितले.

## लाडकी बहीण योजनेची रक्कम वाढवणार

किती हुशार मुलगी असली तरी पैशांमुळे शिकवले गेले नाही. मात्र आता त्यांच्या शिक्षणाचा खर्च मंत्रालयातील त्यांचा मामा करतील. महिलांना बसमधून अर्ध्या दरात प्रवास करण्याची सवलत दिली. त्यामुळे तोट्यातील एसटी नफ्यात आहे. सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली. त्यावेळी काँग्रेससह अनेकांनी आम्हाला वेड्यात काढले. परंतु त्यांच्या नाकावर टिच्चून अडीच कोटी महिलांना लाभ दिला. परंतु हे सावत्र भाऊ तुमची योजना बंद करू पाहत आहेत. या योजने विरोधात ते कोर्टात गेले आहे. सरकार आता लाडक्या बहीण योजनेची रक्कम वाढवून 2100 रुपये करणार आहे.

# पाटोदा तालुक्यात युवा नेते महेश आजबेंचा झंझावात

## ग्रामीण भागात आ.आजबेंना मतदारांचा मोठा प्रतिसाद

आष्टी प्रतिनिधी आ. बाळासाहेब आजबे यांचे पुतणे युवा नेते महेश यांनी आमदार आजबे यांच्या प्रचारासाठी पाटोदा तालुका पिंजून काढला आहे. त्यांच्या प्रचार दौऱ्याला ग्रामीण भागातून प्रचंड प्रतिसाद मिळत असून मतदारांचा कौलही मिळत आहे. विधानसभा निवडणुकीचे सध्या रणधुमाळी सुरू असून सर्वच नेते आणि नातेवाईक प्रचारांमध्ये उतरलेले दिसत आहेत. यामध्ये आमदार बाळासाहेब आजबे यांचे पुतणे युवा नेते महेश आजबे हे देखील आमदार बाळासाहेब आजबे



यांचा जोरदार प्रचार करताना दिसून येत आहे. पाटोदा तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून त्यांचा प्रचार दौरा सुरू आहे. या दौऱ्याला मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे. त्याचबरोबर मतदारांचा कौल देखील आमदार आजबेंना मिळत असल्याचे दिसत आहे. आमदार बाळासाहेब आजबे यांनी गेल्या पाच वर्षांमध्ये पाटोदा तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात विकास निधी खेचून आणला आहे पाटोदा तालुक्यामध्ये ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर विकास कामे झालेले असल्याने आमदार बाळासाहेब आजबे यांना मतदारांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. जनतेने आमदार बाळासाहेब आजबे यांना मतदान रूपी आशीर्वाद द्यावेत पुढच्या काळात आमदार बाळासाहेब आजबे यांच्या माध्यमातून आणखी मोठ्या प्रमाणात राहिलेले विकास कामे पूर्ण करण्यात येतील असा विश्वास महेश आजबे प्रचार दौऱ्या दरम्यान मतदारांना देत आहेत.

# संभाजी ब्रिगेड कोणत्या उमेदवारच कबरड मोडणार



माजलगाव : संभाजी ब्रिगेड ची विचार धारा,सामजिक काम हे माजलगाव मतदार संघात गावा गावात रुजेलेली आहे. संभाजी ब्रिगेड चे अधिकृत उमेदवार विजय दराडे यांनी मागील दहा दिवसात पूर्ण नियोजित दौरे करून माजलगाव मतदार संघ पिंजून काढला असून आता दुसरा टप्पा पुन्हा मतदार संघ फिरण्यास सुरुवात केली आहे. मागील दहा वर्षा पासून प्रती वर्षी रक्त दान शिबिर घेणे, शेतकरी आंदोलन करणे, तहसील,तलाठी,पंचायत समिती,सर्व कार्यालय मधील सामाजिक बांधिलकी ने सर्व सामान्य नागरिकांचे काम करून देणे, मराठा आरक्षण मधे सक्रिय असणारा चेहरा म्हणून विजय दराडे यांच्या कडे बघितल्या जाते. धनगर आणि ओबीसी आरक्षण साठी अनेक आंदोलने सक्रिय सहभागी,मुस्लिम समाज यांना प्रत्येक रमजान मधे कार्यक्रम घेणे, दलीत समाजात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दरम्यान प्रबोधन करणे सर्व जाती धर्मातील जनतेच्या मधे राहणारा शेतक-यांचा, गरिबीतून तरुण जरकरणात उतर असल्याने सर्वत्र कौतुक होत असून मोठ्या ताकतीने मतदान विजय दराडे यांना होण्याची शक्यता आहे. मतदान किती ही होईल सर्व मतदारांचे आभार दौरा सुद्धा विजय दराडे काढणार असून भविष्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मधे अनेक उमेदवार देण्याची तयारी सुद्धा ते

# बीड जिल्ह्यातील विधानसभानिहाय टपाली मत पत्रिकेचे आदान प्रदान

बीड जिल्ह्यातील विधानसभानिहाय टपाली मत पत्रिकेचे आदान प्रदान प्रक्रिया अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात सोमवारी (ता. ११) अधिकारी, कर्मचा-यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी अधिकारी, कर्मचा-यांना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, टपाली मत पत्रिकेचे नोडल अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) महेंद्रकुमार कांबळे, स्वीपचे नोडल अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख, तहसीलदार अविनाश शिंगटे, नायब तहसीलदार माधव काळे यांनी मार्गदर्शन केले.



# राज्यातील भाजप नेते आणि त्यांच्या मित्र पक्षांनी महाराष्ट्र भाजपला आंदण देवून त्यांचे मांडलिकत्व स्वीकारले-जयंत पाटील

## केजमध्ये शंभर टक्के बदल आणि पृथ्वीराज साठेच आमदार होणार पृथ्वीराज साठे यांच्या विजयाचा विश्वास माजी मंत्री जयंत पाटील





गौतम बचुटे/ केज :- एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या महायुतीतील सर्वांनी महाराष्ट्र हा गुजरातला आंदण देवून गुजरातचे मांडलिकत्व स्वीकारले आहे. राज्यातील महत्वाचे उद्योगधंदे बाहेर गेले आहेत तर तिजोरीत पैसे नसताना लाडकी बहीण सारख्या योजना जाहीर करून शेंडी लावण्याचा प्रयत्न केला जातोय मात्र आमचे सरकार सत्तेवर आल्यास महिलांना तीन हजार रू एवढे भरीव अनुदान देवून शेतक-यांची कर्जमाफी बेकाराना आर्थिक मदतीस सह सर्वांना मोफत आरोग्य सेवा दिली जाईल असे सांगितले. तसेच पक्षावर अनेक प्रसंग आले तरी पृथ्वीराज साठे डगमगले नाहीत, त्यांनी पक्षाची साथ सोडली. म्हणून त्यांना पवार साहेबांनी संधी दिली. त्यांची आर्थिक बाजू कमवत असली तरी स्वभावाने गरीब असलेल्या माणसाला लोक ओळखतात. ही लढाई विचारांची, धनशक्ती विरुद्ध लोकशक्तीची आहे. म्हणून केजमध्ये १०० टक्के बदल होणार असून पृथ्वीराज साठे हेच आमदार होणार आहेत. असा विश्वास राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केला. केज येथे विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत जयंत पाटील हे बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी सभापती राजेसाहेब देशमुख हे तर पक्ष निरीक्षक जिवन गोरे, खासदार बजरंग सोनवणे, उमेदवार पृथ्वीराज साठे, माजी आ. संगीता ठोंबरे, डॉ. अंजली घाडगे, नगराध्यक्षा सीता बनसोड, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, उबाठा शिवसेनेचे जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे, सुशीला मोराळे, शेकापचे भाई मोहन गुंड यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना जयंत पाटील म्हणाले की, लाखो तरुणांना रोजगार देणारे उद्योग गुजरातला गेले, त्यांना मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्र्यांनी थांबविण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांनी दिल्लीला घाबरून मांडलिकत्व स्वीकारले. त्यामुळे महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न कमी झाले, तर गुजरातचे दरडोई उत्पन्न वाढले. गुजराथी लोक श्रीमंत झाले. भाजपने जाणीवपूर्वक जाती - जातीमध्ये, समाजा - समाजामध्ये, धर्मा धर्मामध्ये तेढ निर्माण केल्याचा आरोप त्यांनी केला. स्वाभिमानी महाराष्ट्र असून लढणा-याच्या पाठीमागे उभे राहणारा महाराष्ट्र आहे. महागाई, जीएसटी, बेकरीने जनता बेजार असून सत्तेत असलेल्या आमदारांना अंबाजोगाई जिल्हा, बुट्टेनाथ व कोरडेवाडी तलावाचा प्रश्न सोडविता आला नाही. म्हणून हे प्रश्न सोडवून घेण्यासाठी पृथ्वीराज साठेंना निवडून देण्याचे आवाहन ही पाटील यांनी केले.

## मुंदडांनी एकगठ्ठा मतांची अपेक्षा करू नये - खा. बजरंग सोनवणे

गत २०१९ च्या लोकसभेच्या निवडणुकीत मुंदडा हे भाजपला मॅनेज झाले होते. त्यांनी राष्ट्रवादी असताना कधीच भाजपच्या खासदारांवर टीका टिप्पणी केली नाही. तर पवार साहेबांनी तिकीट देवून सुद्धा त्यांनी गद्दारी करीत भाजपात गेले. त्यांनी नाद कुणाचा ही करावा, पण पवार साहेबांचा करू नये, ते कुस्ती न करताच समोरच्याची पाठ लोळवितात. त्यांनी एकगठ्ठा मतांची अपेक्षा करू नये. आता जनताच मुंदडा यांची सत्तेची मस्ती उतरविणार. अशा शब्दात खा. बजरंग सोनवणे यांनी टीका केली.

## मुंदडांची हुकूमशाही व दडपशाही नष्ट करा - पृथ्वीराज साठे

मतदार संघात आमदार मुंदडांची वाढलेली हुकूमशाही व दडपशाही मतदारांनी नष्ट करावी. मला मतदार संघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी दिल्यास सर्वांना हेवा वाटेल असा विकास करून दाखवीन अशी ग्वाही उमेदवार पृथ्वीराज साठे यांनी दिली.

# तेच देवाचे मंदिर: जे दयाघन शरीर

कणव किंवा दयाळूपणा हा माणसाचा एक स्वभाव आहे. सद्गुण माणसास अलंकारासारखे सुशोभित करतात. दयाभाव आत्मसात केला की आपण आनंदी आणि हसतमुख राहू शकतो. त्यामुळे आपल्या आसपास नेहमी सकारात्मकता निर्माण होईल, शिवाय आपण जास्तीत जास्त लोकांना आपल्या जीवनाशी जोडू शकतो. बापू उर्फ श्रीकृष्णदास निरंकारी यांचा हा मार्गदर्शक लेख वाचकसेवेशी सविनय सादर... संपादक.

मानवाचे चारित्र्य दया नावाच्या निष्कलंक दागिन्यांमुळे चौफेर झळाळू लागते. जो माणूस काया, वाचा आणि मनातून जीवजंतूवर दया व प्रेम करतो. त्या जीवजंतूसह माणसेसुद्धा त्याच्यावर जीव लावतात. त्याचे ते शरीर सर्वांना सुख, समाधान, क्षमा व शांती प्रदान करणारे माहेरघर वाटू लागते. असे सर्वांशी स्नेहभाव ज्याचे जुळले त्याचे मनुष्यजन्म खरोखरच सार्थकी लागले, असे दासाला वाटते. संतवचन साक्ष देते-
"दया क्षमा शांती! तेथे देवाची वस्ती!!"

दि.१३ नोव्हेंबर हा जागतिक कणव अथवा दयाळू दिन म्हणून सन १९९८ सालापासून संपूर्ण जगभरात साजरा केला जातो. या दिनाची संकल्पना जागतिक दयाळू चळवळीतून निर्माण झाली. यामध्ये ऑस्ट्रेलिया, थायलंड, अमेरिका, इंग्लंड यांसारख्या देशांचा पुढाकार होता. सर्व लोकांनी एकत्र यावे, माणुसकी जपावी, हिंसात्मक कृत्यांना आळा बसावा अशा उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो. सद्याच्या धावपळीच्या जीवनात प्रत्येक व्यक्ती आपापल्या कामात व्यस्त असतो. आपण आपल्या जगात इतके हरवलेले असतो की आसपास काय चालू आहे याचे, कित्येकदा आपल्याला भान नसते. आपण इतरांशी कसे वागतो याकडे आपण कधीच लक्ष देत नाही. अनेकांना विविध प्रकारचे ताणतणाव असतात. त्यामुळे चिडचिडपणाची वृत्ती वाढत आहे. माणूस टेंशनमध्ये असला की एकाचा राग दुसऱ्यावर काढतो. त्यामुळे जवळचे व्यक्ती सुद्धा विनाकारण दुखावले जातात. त्यामुळे विनाकारण नकारात्मकरता आपल्यामध्ये निर्माण होत राहते. सांप्रतकाळी विश्वव्यापी संत निरंकारी मिशनच्या ज्ञानप्रवाहात स्वतःला झोकून दिल्यास आपसूकच आपल्या अंगी कणववृत्तीची रुजवण होते, हे मी आपल्या स्वानुभवाद्वारे व्यक्त करत आहे. संत निरंकारी जगताचे सुप्रसिद्ध ग्रंथकार संतश्रेष्ठ शहंशहा अवतारसिंहजी महाराज नेत्रांत अंजन घालतात-
"देह सभनां दी इक्को जेही इक्को रब संवारी ए। जात पात दे झगड़े काहदे काहदी लोकाचारी ए। हिंदू मुसलम सिख ईसाई इक्को रब दे बन्दे ने। बन्दे समझ के प्यार हैं करना चंगे भावे मन्दे ने।" (सम्पूर्ण अवतार बाणी: पद क्र.९-ख.)

आपल्या सभोवती अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य या मूलभूत गरजांच्या पूर्ततेअभावी असहाय असलेली माणसे पुष्कळ आहेत. त्यांच्या विषयी थोडी थोडकी माणुसकी जागृत झाली पाहिजे. आपल्यामध्ये निर्माण झालेली ही नकारात्मकता काढून टाकण्यासाठी आपल्याला दयाळूपणा आत्मसात केला पाहिजे. रोजच्या जीवनात आपण कसे वागतो, बोलतो याकडे लक्ष द्यावे. नेहमी शांतपणे, नम्रपणे बोलावे. दयाळूपणा हा स्वभाव आहे. तो आत्मसात केला की आपण आनंदी आणि हसतमुख राहू शकतो त्यामुळे आपल्या आसपास नेहमी सकारात्मकता निर्माण होते. त्यामुळे आपण जास्तीत जास्त लोकांना आपल्या जीवनात जोडू शकतो. आप-परभाव न करता सर्वांवर प्रेम, दया, माया आणि आपुलकी करतो, तोच साक्षात भगवंत असतो. जगद्गुरू संतशिरोमणी तुकारामजी महाराज म्हणतात-
"जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।। तोचि साधू ओळखावा। देव तेथेचि जाणावा।। दया करी जे पुत्रासी। तेचि दास आणि दासी। तुका म्हणे सांगो किती। तोचि भगवंताची मूर्ती।।"

माणसाने दयाळूपणा जपताना स्वतःमध्ये वर्तनबदल आणले पाहिजे. सर्वात आधी स्वतः दयाळूपणा आत्मसात करावे. स्वतःसह इतरांसोबत दयाळूपणाने वागावे. प्राण्यांसाठी मनात दया ठेवावी. जे लोक आपली काळजी करतात, त्यांच्याशी आपुलकीने वागावे. अडचणीत असलेल्या लोकांना मदत करावी. आनंदी आणि हसतमुख असावे. चेहऱ्यावर नेहमी हलके स्मित ठेवावे. प्रत्येक व्यक्तींप्रती मनात नेहमी आदराची भावना असावी. कोणालाही कमी लेखता कामा नये. आपण काय बोलतो? यावर नियंत्रण ठेवावे. बोलताना आपले बोलणे मृदू असावे. समोरच्याचे म्हणणे ऐकूण घ्यावे. दुसरी बाजू समजून घेण्याचा प्रयत्न करावा. रागावर नियंत्रण असू द्यावे. विनाकारण चिडचिड होऊ देवू नये, शांत रहावे. ताणतणाव आल्यास आपला आवडता छंद जोपासावा. गाणी ऐकावीत व पुस्तके नियमित वाचावित. एखादी व्यक्ती आपल्यावर चिडली असेल तर, त्या व्यक्तीला स्मितहास्य ठेवून सॉरी म्हणावे. कारण थोर विचारवंतांना दयाभाव हाच अख्ख्या विश्वातील सर्व धर्मांचे मूळ म्हणजेच माणुसकीधर्म असल्याचा आत्मानुभव आलेला आहे. संत निरंकारी मिशनचे युगद्रष्टा सद्गुरू निरंकारी बाबा संतशिरोमणी हरदेवसिंहजी महाराजांनी म्हटले-
"दया किसी पर तू भी कर ले दया तुझे जो चाहिये। दान क्षमा का तू भी दे दे क्षमा तुझे जो चाहिये। अपने लिए तू चाहता है जो सो औरों को देता जा। कहे 'हरदेव' सभी को सुख दे तू भी सुख को लेता जा।" (सम्पूर्ण हरदेव बाणी: पद क्र.५६)

संपूर्ण दैवी सद्गुण व सदाचारासाठी संत निरंकारी मिशन जगात अग्रेसर आहे. या मिशनमध्ये सर्व ईश्वरभक्त जातपात, धर्मपंथ, गरीबश्रीमंत, काळागोरा, लहानमोठा, स्त्रीपुरुष, उच्चनीच किंवा आपलापरका आदी भेदभाव न करता प्रेमाने वागतात. कारण सर्व घटात एकच आत्मज्योत तेवत आहे, हे ते जाणतात. दया, माया, प्रेम, नम्रता, सहनशीलता, बंधुभाव, आपुलकी या सर्व भावनांची मुळे ब्रह्मज्ञानात खोलवर रुजलेली असतात. जगात बहुतांश श्रीमंत व्यक्ती गरीबावर अन्याय करताना दिसतात. गरीबावर दया करण्याचा त्यांचा जणू काही जन्मच झालेला नसतो. त्यांचे शारीरिक व आर्थिक शोषण करण्याचा त्यांना परमेश्वराने वरदानच दिले असते की काय? कोण जाणे? अधिकांश अधिकारी व पदाधिकारी छोट्या कर्मचाऱ्यांना छोट्या मोठ्या कामासाठी लाच मागतात. अशांची खरेच कीव करावीशी वाटते. बिच्चारे कर्मचारी त्यांची कीव करतात. त्यांनी आपली गाय मारली, म्हणून ते त्यांचे वासरू मारत नाही. इतरांनी आपल्यावर केवळ दयाच करावी, असे सर्वांनाच वाटते. म्हणूनच प्रथमात प्रथम दयाळूपणा मला स्वतःला अंगिकारणे काळाची गरज आहे. आधी एखाद्यावर दया करून कसे वाटते बघाच. जीवनात काहीतरी कमविल्याचे समाधान वाटते, एकदम मस्त वाटते. जन्म सार्थक सार्थक झाले...! महान ग्रंथकार संतश्रेष्ठ तुलसीदासजी महाराजांनी कोरून ठेवले-
"दया धर्म का मूल है, पाप मूल अभिमान! तुलसी दया न छोडियें, जबलग घट में प्राण!!"
!! वर्ल्ड काईंडनेस्स डेच्या निमित्ताने समस्त बंधुभगिनींना हार्दिक शुभेच्छा !!

- संत चरणधूळ -
बापू- श्रीकृष्णदास निरंकारी.

# साहित्यतेज दीपावली विशेषांक प्रकाशन सोहळा व खुले कविसंमेलन उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)– दिनांक १० नोव्हेंबर रोजी साहित्य क्षेत्रातील साहित्यतेज साप्ताहिकाच्या संपादिका कवयित्री सुप्रिया जाधव यांनी संपादित केलेल्या साहित्यतेज दीपावली विशेषांकाचा प्रकाशन सोहळा तसेच निमंत्रित कविंचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.माधुरीताई चौधरी (सुप्रसिद्ध साहित्यिका, छत्रपती संभाजीनगर ) यांनी भूषविले तर प्रमुख उपस्थिती म्हणून शाहीर कवी श्री.उत्तमराव म्हस्के, मा.प्रकाश पाठक (कवी,लेखक,चित्रकार) आणि कवी, लेखक श्री.विजयकुमार पांचाळ (महाराष्ट्र शासन गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त) हे होते. हा प्रकाशन सोहळा तसेच कविसंमेलनाचा कार्यक्रम सिडको रोड, महाराणा प्रताप उद्यान (कॅनॉट गार्डन ) छत्रपती संभाजीनगर येथे निसर्गाच्या सानिध्यात आयोजित करण्यात आला होता.

कवयित्री सौ.सुनिताताई कपाळे यांच्या मधुर आवाजात सादर झालेल्या स्वागतगीताने या प्रकाशन सोहळ्याची सुरुवात झाली.मान्यवरांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते मसाहित्यतेज दीपावली विशेषांकाचेफप्रकाशन करण्यात आले. त्यानंतर कविसंमेलनाला सुरुवात झाली. लेक,आई, बाप, आजोबा, बहीण, सैनिक, कविता काय असते?, प्रेम, व्हिडिओ कॉल अशा विविध आध्यात्मिक, सामाजिक विषयावर बहारदार काव्यरचना सादर केल्या.तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या मा.माधुरीताई चौधरी यांनी नवोदित साहित्यिकांना बहुमूल्य असे मार्गदर्शन केले. कविता लिखाणासोबतच इतर साहित्यिकांच्या कविता आपण ऐकल्या पाहिजे, तसेच कवितेचा दर्जा वाढविण्यासाठी व प्रभावी सादरीकरण करण्यासाठी एक साहित्यिक म्हणून वाचन केले पाहिजे, एक चांगला श्रोता होणे गरजेचे आहे, असे मत त्यांनी मांडले आणि मराठी, हिंदी भाषेत प्रभावी रचना सादर केल्या.

प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले शाहीर श्री उत्तमराव म्हस्के यांनी बहीण ही हृदयस्पर्शी रचना सादर केली. त्यानंतर साहित्यिक प्रकाश पाठक यांनी प्रेरणादायी रचना सादर केली. तसेच कवि श्री.विजयकुमार पांचाळ यांनी आपल्या छत्रपती संभाजीनगर येथील साहित्यिकांचा पुढील प्रवास उज्ज्वल असल्याचे सांगत वंशाचा दिवा या विषयाची सामाजिक, भावस्पर्शी रचना सादर करत रसिकांची मने जिंकली. या संपूर्ण कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन विनोदी स्वरूपात कवी प्रा.डॉ. सुशिल सातपुते यांनी केले. त्यांच्या सूत्रसंचालनाचे विशेष कौतुक अध्यक्षा माधुरीताई चौधरी यांनी भरभरून केले. कविसंमेलनात उपस्थित असलेल्या



सर्वच कविंच्या कविता अतिशय प्रभावी झाल्या. निमंत्रित कवि कवयित्री सौ. सुनिताताई कपाळे, श्री.सुरेश खरात, श्री.संभाजी गायकवाड, श्री.आर. पी.शिखरे, श्री.दिपक नागरे, श्री.राहुल इंगोले, श्री.ज्ञानेश्वर काळे, सौ.मंगल वाघमारे, श्री.विवेक जोशी, श्री.योगेश कोंडके, श्री.सागर कोलते, श्री.शरद म्हकांळे, श्री.उल्हास देशपांडे, सौ. धम्मप्रीया खरात, श्री.अर्जुन गायकवाड, श्री.गोविंद कांबळे यांनी उत्स्फूर्तपणे कविता सादर केल्या. सर्व कवी कवयित्री यांना पुष्पगुछ देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्याचे आयोजन संपादिका, कवयित्री सुप्रियाताई जाधव यांनी केले. अतिशय प्रतिकूल परिस्थिती असूनही साहित्याप्रती असलेले प्रेम जपण्यासाठी सुप्रियाताई जाधव यांनी साहित्यतेज हा दीपावली अंक प्रकाशित केला आहे. महाराष्ट्रातील नावाजलेल्या साहित्यिकांचे साहित्य व नवोदित कविचे साहित्य एकाच ठिकाणी आपल्याला वाचायला मिळेल. हेच या अंकाचे विशेष आहे. सर्व स्तरातून या प्रकाशन सोहळ्याचे तसेच कविसंमेलनाचे कौतुक होताना दिसत आहे. या कार्यक्रमाचे आभार संपादिका कवयित्री सुप्रियाताई जाधव यांनी व्यक्त केले.

## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस व खासकरून बीड जिल्ह्यातील जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे सुचीत करण्यात येते की, आमचे पक्षकार नामे मंजुषा भ्र. ज्ञानदेव बंड वय ५७ वर्षे, धंदा शेती व घरकाम रा. जिजाऊ मार्ग, शाहुनगर, पांगरी रोड, बीड ता. जि. बीड यांनी दिलेल्या माहिती, अधिकार व दाखवलेल्या कागदपत्रावरुन खालीलप्रमाणे जाहीर प्रगटन देतो की, आमच्या पक्षकारांनी १) देविदास पि. गणपतराव कुरुळे, २) सोजरबाई भ्र. लक्ष्मण कुरुळे, ३) पदमीनबाई भ्र. रावसाहेब घाडगे, ४) संजीवनी भ्र. संदिपान कदम, ५) विमल भ्र. सटवाराम तपसे, ६) सुमन पि. गणपत कुरुळे, ७) शंकर पि. लक्ष्मण कुरुळे, ८) गोरख पि. लक्ष्मण कुरुळे, ९) मिरा भ्र. गोरख कुरुळे, १०) निखील पि. देवीदास कुरुळे, ११) सविता भ्र. देवीदास कुरुळे, १२) पुजा भ्र. मधुकर शेळके यांचे विरुध्द मा. दिवाणी न्यायाधिश साहेब (व.स्तर) बीड यांचे न्यायालयात वाटणी व स्वतंत्रताक मिळणे बाबत व दिनांक १२/१०/२०२३ रोजी झालेले नोंदणीकृत हक्कसोडपत्र क्र. ५००४/२०२४ हे वादीस फसवुन करून घेतलेले असल्याने वादीवर बंधनकारक नाही असे जाहीर करणे बाबत (स्पेसिफीक
रिलीफ ॲक्ट कलम ३१ आणि ३४ प्रमाणे) दावा दाखल केला आहे. त्यास रे.दि.मु.क्र. १२२/२०२४ असा पडलेला आहे. सदरील वादग्रस्त मिळकती खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | गट नंबर | क्षेत्रफळ हे. आर | आकार रु.पै. | गावाचे नाव | वादीचा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८ | ००.२५ | ०.६८ | तळेगाव ता. बीड | १/७ प्रत्येकी |
| २ | १७ | ००.९७.५० | ०३.३४ | तळेगाव ता. बीड | १/७ प्रत्येकी |
| ३ | २० | ०१ .१ ५ | ०३.२१ | तळेगाव ता. बीड | १/७ प्रत्येकी |
| ४ | २३ | ०१ .७३ | ०३.७८ | तळेगाव ता. बीड | १/७ प्रत्येकी |
| ५ | २६ | ०१.५५ | ०१.०८ | तळेगाव ता. बीड | १/७ प्रत्येकी |
| ६ | २९ | ०२.४० | ०१.६९ | तळेगाव ता. बीड | १/७ प्रत्येकी |
| एकूण | | ८.२१ | १३.७८ | | |

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर जमीन ही आमच्या पक्षकाराशिवाय कोणाकडुन कोणीही खरेदी-विक्रीचा व्यवहार जसे की, तोंडी व्यवहार अथवा लेखी स्वरुपात ईसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, आम मुखत्यारपत्र असा व्यवहार करु नये. जर आमच्या पक्षकाराचे संमती शिवाय इतर कोणाकडुनही सदर जमीनीचा तोंडी व्यवहार अथवा लेखी स्वरुपात ईसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, आम मुखत्यारपत्र असा व्यवहार केल्यास सदर व्यवहार आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.
सबब आहे जाहीर प्रगटन,

बीड
दिनांक : ०९/११/२०२४
मार्फत : एस. एस. नागरगोजे,
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड
मो.नं. ९२८४०७८०९०

जाहीर प्रगटन देणार
मंजुषा भ्र. ज्ञानदेव बंड
मो.नं.

## माझी विठू माऊली !!

मनास आणली, माणुसकी तव रंगली
जगण्यास आशा न भंगली, या विठ्ठल मंदिरास
माझ्या !! १ !!

दरडोई वाढे सदा भाव, नसे सुशिक्षितांस काम
पण नैवेद्य दाखवे देई दाम, या विठ्ठलास माझ्या
!! २ !!

जाता कोणा कार्यक्रमास, मध्येच विनोद होई
भिती न ऐकावयास, या रखूमाईस माझ्या !! ३

येता रडत यावे, जाता हसत जावे
कोणास भेदभाव नसावे, या मंदिरात माझ्या !!
४ !!

सर्व सण होई साजरा, साखर मीठास आसरा
संकटास मिळे मदतीचा घसरा, या वारकरीत
माझ्या !! ५ !!

भेसळी मिळे वस्तू, घातक करी अनोळखी वस्तू
माणसं ओळख तू, या माऊलीत माझ्या !! ६ !!


जग हातास आले, दूरचे जवळ झाले
जवळचे दूर ना झाले, या पंढरपुरात माझ्या

कार्तिक एकादशी आणि तुळशी विवाह
उत्सव निमित्त सर्व भाविकांना हार्दिक हार्दिक
शुभेच्छाऽऽऽ !! ?

~@ शब्दश्री विलास देवळेकर ?
मुंबईकर

# आखिर सच उगल दिया २ या हिंदी गुन्हेगारी विश्वावर आधारित वेबसीरिजचे चित्रीकरण नुकतेच संपन्न!

पनवेल (प्रतिनिधी–गुरुनाथ तिरपणकर)
ङ्गआखिर सच उगल दिया ङ्ग या पहिल्या वेबसिरीजच्या भव्य दिव्य यशानंतर ङ्गआर्यारवी एंटरटेनमेंटङ्ग आपणासमोर घेऊन येत आहे ङ्गआखिर सच उगल दिया – भाग २ङ्ग प्रमोद दळवी यांच्या संकल्पनेतून साकारलेली, महेश्वर तेटांबे निर्मित आणि दिग्दर्शित ङ्गआखिर सच उगल दिया २ङ्ग या हिंदी वेबसिरीज भाग २ चे चित्रीकरण नुकतेच पनवेल नगरीतील काळुंद्रे या गावांत संपन्न झाले. गुन्हेगारी विश्वावर आधारित आणि गुन्ह्यांचा अचूक वेध घेणा–या ह्या वेबसीरिजमध्ये अनेक नामवंत कलावंतांनी सहभाग घेतला. त्यांत प्रामुख्याने सुनील पाटेकर, रवी मोरे, रुपेश पालव, अविनाश राऊत, सुरेश डाळे पाटील, अरुण धावडे, एम नटराज, गीता कुडाळकर लक्ष्मी गुप्ता, बाळाराम चिखलेकर, प्रमोद दळवी, विशाल म्हसकर, गुरुनाथ तिरपणकर, ज्येष्ठ नाट्य अभिनेते राम सारंग, मंगल यादव, नृत्य दिग्दर्शक मनोज जाधव (एम जे), नामदेव मोहिते, सारिका विजय जाधव, शिमोन डेविट सकट, बालकलाकार आराध्या, जयश्री, शौर्य दिनेश मोहित आदी सर्व कलावंतानी महत्वपूर्ण भूमिका साकारली आहे. पटकथा–संवाद महेश्वर तेटांबे यांचे असुन या वेबसिरीज साठी छायाचित्रणाची महत्वपूर्ण जबाबदारी मकरंद अनंत पांचाळ यांनी पार पडली असून सोनाली पेडणेकर यांची रंगभूषा लाभली आहे.




संकलन आणि संगीत तसेच ध्वनिमुद्रणाची जमेची बाजू महेश मोरे यांनी सांभाळली आहे. तर सहाय्यक दिग्दर्शन अक्षय भोसले यांनी केले आहे. या संपुर्ण वेबसिरीजचे व्यवस्थापन अरुण धावडे आणि
लक्ष्मी गुप्ता यांनी केले. या वेबसिरीजमध्ये काम करणा–या सर्व कलावंतांची तीन दिवसीय भोजन व्यवस्था सौ.मंगल यादव (करंजाडे) यांनी केली. या वेबसिरीज साठी प्रसिद्ध समाजसेवक, अभिनेते खलील शिरगांवकर, रवी शिवराम मोरे, सचिन परदेशी, भास्कर वाकडीकर, मनीष व्हटकर, विकास म्हसकर, बाळाराम चिखलेकर आणि विशाल म्हसकर यांचे विशेष योगदान लाभले आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १३ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com


# धनंजय मुंडेंचा परळी मतदारसंघात प्रचाराचा झंझावात

## विकासाचा उर्वरित अनुशेष भरून काढणार - धनंजय मुंडे

परळी (प्रतिनिधी) धनंजय मुंडे यांनी परळी विधानसभा निवडणुकीत प्रचाराचा झंजावात सुरूच ठेवला असून आज अंबाजोगाई तालुक्यात त्यांचा हा झंझावात पोखरी, वाघाळा, भारज, नांदगाव, सायगाव, सुगाव या गावांमध्ये बैठकांच्या स्वरूपात पाहायला मिळाला.या दौऱ्यात धनंजय मुंडे यांनी कॉर्नर बैठका घेत स्थानिक ग्रामस्थांशी संवाद साधला. आतापर्यंत दिलेला प्रत्येक शब्द पूर्ण करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला असून यापुढेही विकासाचा उर्वरित अनुशेष भरून काढण्यासाठी मी कटिबद्ध असल्याचे धनंजय मुंडे यावेळी म्हणाले. या भागात मागेल तिथे सभागृह, पर्यटन मधून व अन्य योजनेतून मंदिरे व अन्य धार्मिक स्थळांचा विकास यांसह अनेक विकास कामे पूर्ण झाली आहेत. त्याचबरोबर अनेक कामे प्रगतीपथावर तर अनेक कामे निधीसह मंजूर करण्यात आली असल्याचेही धनंजय मुंडे म्हणाले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ऍड. राजेश्वर चव्हाण, तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, विलास बापू मोरे, अविनाश मोरे, पम्पू पाटील, रणजित चाचा लोमटे यांसह नांदगाव येथे रामलिंग चव्हाण, अजित दादा गरड, दिगंबर चव्हाण पोखरी येथे महादेव नेऊन, श्रीहरी होळकर, भागवत निकम, नरसिंग निकम, मिलिंद व्हावळे, मन्सूर शेख, वाघाळा येथे नाना





भगत, गणेश भगत, चव्हाण उपसरपंच, महादेव वाघमारे, गणपतराव राऊत, मस्केजी, अण्णा शेळके, ऋषी लोमटे, श्रीमंत क्षीरसागर, भारज येथे वसंतराव शिंदे, ताराचंद शिंदे, माणिकराव शिंदे, मनोज शिंदे, विकास शिंदे, हनुमंत शिंदे, ईश्वर शिंदे, सायगाव येथे आजमभाई, हासमी सर, जावेद भाई, फताउल्ला साहेब, खिलाफत अली, असीम भाई, माफीज भाई, कैलास मस्के, जाबेर भाई, सादिक भाई यांसह आदी उपस्थित होते.

# मानव जातीच्या हितासाठी प्रगत समाजाला अध्यात्माची नितांत गरज - डॉ. लक्ष्मण शिवणेकर

अध्यात्मिक पाया पक्का असेल तर जीवनात शांती सुख आणि समाधान या गोष्टी लाभतात आणि त्यामुळेच शशिकांत सावंत यांचा ७५ वर्षांचा जीवनप्रवास सफल झाला आहे. सध्याच्या जागतिक तणावपूर्ण परिस्थितीत आज मानव जातीच्या हितासाठी प्रगत समाजाला अध्यात्माची नितांत गरज आहे असे उद्गार ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. लक्ष्मण शिवणेकर यांनी आपल्या संबोधनात काढले. भगवे वादळ या साप्ताहिकाच्या तिस–या वर्धापन दिन सोहळ्यात ते बोलत होते.मुंबई मराठी ग्रंथालय सूरेंद्र गावस्कर सभागृहात, साप्ताहिक भगवे वादळ या वृत्तपत्राचा तृतीय वर्धापन दिन, विशेष अंकाचे प्रकाशन व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा दिनांक १० नोव्हेंबर २०२४ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत थाटामाटात संपन्न झाला. व्यासपीठावर डॉ. जगन्नाथ हेगडे (माजी नगरपाल), डॉ. सुकृत खांडेकर (संपादक दैनिक प्रहार), डॉ लक्ष्मण शिवणेकर ( जेष्ठ शिक्षण तज्ज्ञ




व साहित्यिक), विलास खानोलकर (माजी दिल्ली सेन्सर बोर्ड सदस्य), राम मेस्त्री (जेष्ठ साहित्यिक), आणि मधुकर गजाकोश (जेष्ठ साहित्यिक) है उपस्थित होते.ज्येष्ठ पत्रकार समाजसेवक व साहित्यिक कवी शशिकांत सावंत यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या (अमृत महोत्सव) निमित्ताने आणि साप्ताहिक भगवे वादळ तृतीय वर्धापन दिनाचे औचित्य साधून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ङ्कजीवन गौरवङ्क पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच चंद्रकांत सावंत (समाजसेवक– आदर्श शिक्षक) यांनाही मान्यवरांच्या हस्ते ङ्कजीवन गौरव पुरस्कारानेङ्क सन्मानित करण्यात आले. वृत्तपत्र क्षेत्रातील आव्हाने दशा आणि दिशा या संबंधी बोलताना प्रहार वृत्तपत्राचे संपादक डॉ.सुकृत खांडेकर यांनी चिंता व्यक्त केली. अनेक वक्त्यांची अभिनंदनपर तसेच शुभेच्छापर भाषणं झाली. महाराष्ट्राच्या कानाकोप–यातून आलेल्या व विविध क्षेत्रात कार्य करून छाप पाडणा–या व्यक्ती मित्र परिवार व आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सर्व उपस्थित पुरस्कार्थ्यांनी भगवे फेटे बांधल्यामुळे संपूर्ण सभागृह भगवामय झाले होते. अशा भगव्या वातावरणात कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आली. विविध क्षेत्रातील मउत्कृष्ट कामगिरीबद्दलफ साठ व्यक्तींना पाहुण्यांच्या हस्ते ङ्कशाल पुष्पगुच्छ आणि स्मृती चिन्हङ्क देऊन, बहुविध पुरस्काराने मगौरविण्यातफ आले. याप्रसंगी संत शिरोमणी रोहिदास महाराज मअंगाईफ गीताचे, गीतकार विलास देवळेकर, तसेच संगीतकार एकनाथ धयाळकर यांनी स्वरबद्ध केलेले गीत कु. ऋतिका मुरुडकर यांनी गायले. कार्यक्रमाचे सांगता राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजी सोनावणे यांनी करून शेवटी सर्व उपस्थितांचे व सहका–ंचे आभार मानले.

# डॉ.ज्योतीताई मेटेना सर्वाधिक मताधिक्याने निवडून देणार कॉर्नर सभेतून एकमुखाने मतदारांचा निश्चय



बीड (प्रतिनिधी) बीड मतदार संघातून ज्योतीताई मेटे याना बीड मतदार संघातून मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचा निर्धार पिंपळनेर सर्कल आणि बहिरवाडी सर्कल मधील बीड मतदार संघातील समाविष्ट गावांनी येथे झालेल्या कॉर्नर सभेतून उपस्थित नागरिकांकडून व्यक्त करण्यात आला. बीड मतदार संघातील अपक्ष उमेदवार डॉ ज्योती विनायक मेटे यांच्या प्रचारार्थ कॉर्नर सभा परिसरात पार पडल्या . या सभेसाठी बीड भागातून मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.

कॉर्नर बैठका, रॅली, दारोदारी जाऊन कार्यकर्ते ज्योती ताई यांना निवडून आणण्यासाठी धावपळ करत आहेत. बीड शहरासह ग्रामीण भागातून प्रचार रॅलीला आणि कॉर्नर बैठकांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून बैठकीत एकमुखाने, ज्योती विनायक मेटे यांना आम्ही आमच्या भागातून सर्वाधिक मताधिक्य देणार असल्याचे एकमताने सगांत आहेत.

# आशा...

जीवन जगण्याचा एक मार्ग म्हणजे आशा आहे.

अगदी लहानपणापासून ते म्हातारा होईपर्यंत आशा पल्लवीत जातात. या आशा कधी पूर्ण होतात तर कधी होत नाहीत.

लहान बाळ आहे ते कधी चालेल, स्वतःचे काम ते स्वतः कधी करेल, इथून आशाला सुरुवात होते. काही मुलांचा प्रोग्रेस लवकर होतो तर काही मुलांचा प्रोग्रेस उशिरा होतो. मग तिथे आशा आहे ती निराशेला पकडायला सुरुवात करते. त्यावेळी निराशा डोके वर काढते.

मग मूल चांगले शकेल का हुशार होईल का? समाजात सगळ्यांना साम ावून घेईल का? सर्व त्याला सामावून घेतील का?

अशा अनेक प्रश्नांच्या आशा आपल्या मेंदूत निर्माण होतात.

मुलं कॉलेजला गेल्यावर हायर क्लास मिळवायलाच हवा!हा आपला अट्टाहास असतो. कारण समाजात त्याला स्वतःचं स्थान निर्माण करायचं असतं. ही आपली एक मोठी अशी असते पण ती कधी पूर्ण होते कधी पूर्ण होत नाही. म्हणून वाईट मार्गाला लागेल असे नाही

अशा या कायम सकारात्मक ठेवाव्यात. आशा पूर्ण झाल्या तर खूपच छान. पण नाही झाल्या तर निराश होण्याचा कारण नाही. त्या मुलाला योग्य वाटत होण्याचं काम आपण करायचे असते.

आता लग्न झाले. मुलाला मुलगी मुलीला मुलगा योग्य तो मिळाला. आता त्याला पहिला मुलगा की मुलगी होईल??

मग काही ठिकाणी मुलगाच हवा ही आशा असते. ही आशा ब–याचदा नव–या मुलीला त्रासाचे होवू शकते. यासाठी जे होईल ते होईल फक्त पहिल मुल बाळ छान होवू दे. असे आपण वागायला हवे.

आपले आई वडील म्हातारे होतात, त्यांची कामे त्यांनी स्वतःच करायला हवेत, असा आपला अट्टाहास असतो. पण ब–याचदा त्यांचे कार्य त्यांना हाताने जमत नाहीत. घराच्या गोष्टींसाठी त्यांना इतरांची मदत घ्यावी लागते. अशावेळी आपण त्यांना मदत करणं गरजेचं असतं. प्रत्येकाच्या बाबतीत आपण आशा करणं सोडून दिल्या पाहिजेत. अथवा आशा करा पण ती पूर्ण होईल अशी अपेक्षा करू नका. असे माझे वैयक्तिक मत आहे.

जीवन हे आशा– निराशावर चाललेले आहे. प्रेम राग, मत्सर या सर्व भावना आहेत. या सर्व भावनांचा आदर करून आपण जीवन जगायला शिकायला हवे.

चांगल्या भावनांची जपणूक करायची. वाईट भावनांना थारा द्यायचा नाही.

बघा प्रयत्न करून सहज शक्य आहे. प्रत्येक माणसाने आशा ह्या कराव्यातच पण त्या पूर्ण होतील हा अट्टाहास धरू नये.

**वसुधा वैभव नाईक,पुणे**

# दिवाळी अंकाने ख–या अर्थाने आपली संस्कृती जपली -पुण्यातील अक्षरधारा येथे उत्तम सदाकाळ याचे प्रतिपादन

ता.१० ( पुणे प्रतिनिधी) दिवाळी अंकांचा एक वेगळा वाचक वर्ग आहे. विनोदी, सामाजिक, कौटुंबिक, महिला विशेषांक,रहस्य गुढ, भय, शृंगारिक आणि ज्योतिष असे विविध विषय घेऊन बाजारात दरवर्षी दिवाळी अंक येतात. तर काही दिवाळी अंक विशिष्ट विषय घेऊन येतात. आपली संस्कृती ही ख–या अर्थाने दिवाळी अंकांनी जपली आहे. महाराष्ट्राला दिवाळी अंकाची जुनी परंपरा लाभली आहे, असे प्रतिपादन पुण्यात अक्षरधारा बुक गॅलरी येथे प्रसिद्ध साहित्यिक उत्तम सदाकाळ यांनी व्यक्त केले. मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. या निमित्ताने पुण्यात अक्षरधारा बुक गॅलरी येथे वाचकांची पावले दिवाळी अंक खरेदी करण्यासाठी वळत आहेत. दिवाळीच्या निमित्ताने विनोदी अंक, सामाजिक अंक, बाल अंक, भय कथा, रहस्य कथा, गुढ कथा असलेले अंक, शृंगारिक अंक किंवा एखादा विशिष्ट विषय घेऊन दिवाळी अंक बाजारात आले आहेत. ते खरेदी करण्यासाठी वाचकांची झुंबड उडत आहे. यावर्षी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा आल्याने मराठी वाचकांची संख्या अधिक वाढली आहे. आपली संस्कृती ही ख–या अर्थाने दिवाळी अंकांनी जपली आहे. महाराष्ट्राला दिवाळी अंकाची जुनी परंपरा लाभली आहे, असे मत पुण्यात अक्षरधारा बुक गॅलरी येथे प्रसिद्ध साहित्यिक उत्तम सदाकाळ यांनी व्यक्त केले. यावेळी तेथे पुणे जिल्ह्यातील प्रसिद्ध साहित्यिक सचिन बेंडभर उपस्थित होते. यावर्षी जत्रा, फिरकी, धमाल धमाका, महाराष्ट्राची जत्रा, अनुरव, संस्कृती,संवाद , व्यासपीठ, खतरनाक, शब्दकुसुम, शुभम, अपेक्षा, धुळपेरनी, कादवा शिवार, मनातली जाणिव, नाथनगरी, अभियंता मित्र, लाडोबा, सुभाषित, कुळवाडी, युवा ध्येय, रंगतदार, धमालनगरी, वार्ता, झुंज, मातृरक्षा, सर्वस्पर्शी, कादवा शिवार, पार्टनर, वर्ल्ड सामना, संयम, प्रसाद, चपराक, नवलकथा आणि भूमिका यांसारखे दिवाळी अंक मराठी वाचकांच्या मनात आपले स्थान टिकवून आहेत, असे त्यांनी यावेळी सांगितले.

# आमदार आमचा, नगराध्यक्ष तुमचा; विधानसभा उमेदवाराने लिखित द्यावे - शेख इरशाद

## विधानसभा निवडणुकीत जरी मुस्लिम समाजाला उमेदवारी देण्यात आलेली नसली तरी निदान बीड नगर परिषदेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीत मुस्लिम उमेदवारास नगराध्यक्ष पदाची उमेदवारी देण्यात यावी.


बीड (प्रतिनिधी) - बीड विधानसभा मतदारसंघातून मुस्लिम उमेदवारास उमेदवारी देण्यात आलेली नाही. यामुळे मुस्लिम समाजावर अन्याय झाला आहे. मुस्लिम समाजाला न्याय मिळावा याकरिता विधानसभा निवडणुकीत जरी मुस्लिम समाजाला उमेदवारी देण्यात आलेली नसली तरी निदान बीड नगर परिषदेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीत मुस्लिम उमेदवारास नगराध्यक्ष पदाची उमेदवारी देण्यात यावी. आणि या विधानसभा निवडणुकीत आमदार म्हणून निवडून येऊ पाहणाऱ्या उमेदवाराने आमदार म्हणून मला संधी द्या, बीड नगर परिषदेचा नगराध्यक्ष मुस्लिम समाजाचा करतो असे ठोस व लिखित आश्वासन मुस्लिम समाजाला देऊन त्याची प्रसिद्धी माध्यमातून स्पष्टोक्ती करावी असे आवाहन दिवंगत गोपीनाथ मुंडे समर्थक धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते शेख इरशाद यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

काही महिन्यापूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये मुस्लिम समाजाच्या नेतृत्वाला उमेदवारी देण्यात आली नाही. तरीही मुस्लिम समाजाने इतर समाजातील उमेदवारांना भरघोस मते देऊन विजयी केले. यामुळे विधानसभा निवडणुकीमध्ये मुस्लिम नेतृत्वाला उमेदवारी देतील या आशेवर समाज होता परंतु या विधानसभा निवडणुकीतही मुस्लिम नेतृत्वाला उमेदवारी देण्यात आली नाही. हा मुस्लिम समाजावर अन्याय आहे. लोकसभेत मुस्लिम समाजाला संधी न देता डावलण्यात आले. याचीच री पुन्हा विधानसभा निवडणुकीत सुद्धा ओढण्यात आली. यामुळे मुस्लिम समाजात मोठ्या प्रमाणात रोष निर्माण झाला आहे. हा रोष आणि नाराजी दूर करण्याकरिता तसेच मुस्लिम समाजावर झालेला अन्याय दूर करून न्याय देण्याकरिता या विधानसभा निवडणुकीत आमदार म्हणून निवडून येऊ पाहणाऱ्या उमेदवाराने आमदार म्हणून मला संधी द्या, बीड नगर परिषदेचा नगराध्यक्ष मुस्लिम समाजाचा करतो असे ठोस व लिखित आश्वासन मुस्लिम समाजाला देऊन त्याची प्रसिद्धी माध्यमातून स्पष्टोक्ती करावी असे आवाहन दिवंगत गोपीनाथ मुंडे समर्थक धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते शेख इरशाद यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.



# कार्तिकी एकादशीनिमित्त विठ्ठल मंदिराला आकर्षक सजावट

# पूजेचा मान मिळाल्याने सगर दाम्पत्याला अश्रू अनावर



**पंढरपूर प्रतिनिधी**

आज कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरीत विठूनामाचा जयघोष पाहायला मिळतोय. कार्तिकी एकादशीची शासकीय महापूजा विभागीय आयुक्त श्री आणि सौ. चंद्रकांत पुंडकुलवार यांच्या हस्ते संपन्न झाली. यावेळी त्यांच्या समवेत श्री विठ्ठलाची महापूजा करण्याचा मान मानाचा वारकरी म्हणून लातूर जिल्ह्यातील उदगीर येथील बाबूराव सगर आणि त्यांच्या पत्नी सागरबाई सगर यांना मिळाला. उदगीरमधील गवंडी काम करून आपला उदरनिर्वाह करणारे सगर दाम्पत्य गेली 14 वर्ष कार्तिकी वारी करत आहेत. त्यांना यंदाचा विठ्छल रूक्मिणीच्या पूजेचा मान मिळाला. विठ्ठलाची पूजा करण्याचा मान मिळाल्यामुळे मानाचे वारकरी सगर दाम्पत्याला अश्रू अनावर झाले.त्याचे बॅनर अनेक ठिकाणी लावण्यात आले आहे. गडचिरोली जिल्ह्यात हे अभियान सुरु झाले आहे.

## विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा संपन्न

आज कार्तिकी यात्रेच्या निमित्ताने आज अडीच वाजता विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा संपन्न झाली. पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत आणि सायली फुलकुंडवार यांच्या हस्ते महापूजा झाली. वारकरी प्रतिनिधी म्हणून उदगीरच्या सगर दाम्पत्याला महापूजेचा मान मिळाला. राज्यात विधानसभा निवडणूक आचारसंहिता असल्यामुळे उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणारी शासकीय महापूजा विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते संपन्न झाली. यावेळी निवडणुका शांततेत पार पडाव्यात. तसेच राज्यातील जनतेला सुख समाधान लाभावं. बळीराजाला सुखी ठेव, असं विठ्ठलाला साकडे घातल्यात आलं.

## विठ्ठल मंदिराला आकर्षक सजावट

आज कार्तिक एकादशी असल्याने श्री विठ्ठल रुक्मिणीमातेच्या गर्भगृहात झेंडू , शेवंती, कार्नेशियन, गुलाब अशा विविध पंधरा प्रकारच्या पाना फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. या सजावटीसाठी वेगवेगळ्या पाच टन फुलांचा वापर करण्यात आला आहे. पुण्यातील विठ्ठल भक्त राम जांभूळकर यांनी ही सटावट केली आहे. श्री विठ्ठल आणि रुक्मिणीमातेचा गाभारा झेंडूच्या फुलांसह विविध आकर्षक पाना फुलांनी सजवण्यात आला आहे. तसंच सोळखांबी, सभामंडप अशा मंदिराच्या विविध भागांना देखील देशी विदेशी फुलांची सजावट करण्यात आली आहे.

## चंद्रभागेच्या तीरी भाविकांची गर्दी

पंढरपुरात आल्यावर चंद्रभागेत स्नान आणिक दर्शन विठ्ठलाचं... पंढरपूरमध्ये आल्यानंतर श्री विठ्ठल दर्शनाला ज्याप्रमाणे महत्व आहे. त्याच प्रमाणे चंद्रभागा स्नानालाही तेवढच महत्व आहे. त्यातच आज कार्तिक शुद्ध एकादशी असल्याने चंद्रभागेच्या स्नानाला वारकरी सांप्रदायात अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे लाखो भाविक चंद्रभागेत स्नानाचा आनंद लुटत आहेत. जवळपास सात लाख भाविक आज कार्तिक यात्रेच्या सोहळ्यासाठी पंढरपूरमध्ये दाखल झाले आहेत.

# अनिलदादा जगताप यांचा शिवसेनेला कायमचा जय महाराष्ट्र; जिल्हाप्रमुख पदाचा दिला राजीनामा!

**मी सर्वसामान्य जनतेचा आणि जनता हीच माझी नेता, इथून पुढे आता कोणत्याही पक्षात जाणार नाही- अनिलदादा जगताप**



बीड, प्रतिनिधी- गेल्या चाळीस वर्षांपासून मी प्रामाणिकतेने आणि निष्ठेने शिवसेनेत सक्रिय असून शिवसेनेच्या माध्यमातून मी जनसेवा करत आलो आहे, सर्वसामान्यांचे समस्या अडचणी सोडवत आलो आहे. परंतु वारंवार शिवसेनेने माझ्यावर अन्याय करत मला डावलले आहे. जेंव्हाही विधानसभा निवडणुकीची तयारी केली तेंव्हा तेंव्हा मला सोडून उमेदवारीची माळ दुसऱ्याच्या गळ्यात घालण्यात आली. बीडमधील अठरा पगड जाती धर्मातील जनसमुदाय माझ्याजवळ येऊन वारंवार दुःख व्यक्त करतो की, सातत्याने शिवसेनेकडून अन्याय तुमच्यावर होतो तरी तुम्ही का हा अन्याय सहन करतात? पण आता बस्स, मी वैतागलोय या अन्यायाला. आता सहन होत नाही. त्यामुळे मी आणि माझे सर्व सहकारी पदाधिकारी शिवसेनेला कायमचा जय महाराष्ट्र ठोकून माझ्या जिल्हाप्रमुख पदाचा राजीनामा देत आहोत. असे अनिलदादा जगताप यांनी पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट केले. इथून पुढे मला मानणारी सर्व जाती धर्मातील जनताच माझी नेता आणि सन्मानीय मनोजदादा जरांगे पाटील हाच पक्ष आहे. मी बीड विधानसभेचा अपक्ष उमेदवार असून माझा विजय निश्चित होणार आहे आणि मी विजयी झाल्यानंतर कोणत्याच पक्षात जाणार नाही व कोणत्याच पक्षातील नेत्याला मानणार नाही. असे शिवसेनेला वैतागलेल्या अनिलदादा यांनी पत्रकार परिषदेत आपले मत व्यक्त केले. अनिलदादा जगताप यांनी आज दि. 12 नोव्हेंबर 2024 रोजी आपल्याला कार्यलयात पत्रकार परिषद घेत शिवसेनेकडून झालेल्या अन्यायाला वैतागून आपल्या जिल्हाप्रमुख पदाचा राजीनामा दिला. याबरोबरच बीड शिवसेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी देखील आपला राजीनामा दिला असल्याचे अनिलदादा यांनी स्पष्ट केले. ०००००

# शिवाजीभाऊ सुतार मित्र मंडळाचा रमेश आडसकरांना पाठिंबा

प्रतिनिधी/प्रतिनिधी

दि. १३ आज शहरातील केशवराज मंगल कार्यालयात शिवाजीभाऊ सुतार मित्र मंडळाच्या वतीने मेळावा आयोजित करण्यात आला होता या प्रसंगी शिवाजी भाऊ मित्र मंडळाच्या वतीने माजलगाव विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार रमेश आडसकर यांना पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे.

विधानसभेची निवडणूक रंगतदार होत असून जनतेतून मिळणा[illegible]या उत्स्फूर्त पाठिंब्यामुळे दिवसेंदिवस आडसकारांची बाजू या निवडणूकीत भक्कम होताना दिसत आहे. गावातील केशवराज मंगल कार्यालयात आज शिवाजीभाऊ मित्र मंडळाच्या वतीने म ळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी भाऊ मित्र मंडळाच्या वतीने अपक्ष उमेदवार रमेश आडसकरांना



त्यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे यावेळी मुंबई उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष म नोहर डाके,काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष हरिभाऊ सोळंके, बाजार समितीचे माजी संचालक निळकंठ भोसले यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती. आडसकरांनी त्यांना दिलेल्या पाठिंब्याबद्दल शिवाजीभाऊ सुतार मित्र मंडळाचे आभार व्यक्त करून त्यांना भविष्यात योग्य संधी देणार असल्याचे एक सुतोवाच केले प्रसंगी त्यांनी माजलगा मतदारसंघातील दुरावस्थे बाबत प्रकाश सोळंके यांना जबाबदार ठरवून त्यांना आता सत्तीच्या विश्रांतीची आवश्यकता असल्याचे सांगीतले.

सोळंकेच्या दुर्लक्षामुळे माजलगाव शहर धारूर तालुका व वडवणी तालुक्यातील अनेक गावांची वाताहत झाली आहे. रस्त्यांची दुरावस्था झाली असुन मला संधी दिल्यास जनतेसाठी २४ तास उपलब्ध राहणार आहे.पुढील पाच वर्ष मी त्याचा सालगडी म्हणून काम करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी शिवाजी भाऊ सुतार मित्र मंडळाचे असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# डॉ. ज्योती मेटे यांनी बीड शहर पिंजून काढले

बीड (प्रतिनिधी) अपक्ष उमेदवार डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी ग्रामीण भागात गाव टू गाव दौरा केल्यानंतर आता त्यांनी बीड शहरांमध्ये प्रचारात आघाडी घेतली आहे. दोन दिवसापासून बीड शहरात विविध भागात पदयात्रा, रॅली आणि कॉर्नर बैठका घेत असून यामुळे बीड शहरांमध्ये डॉ. ज्योती मेटे यांच्या निवडणूक चिन्ह बॅटरी टॉर्च ची चांगलीच चर्चा पाहायला मिळत आहे. त्याचबरोबर या दौऱ्यात डॉ. ज्योती मेटे आणि कार्यकर्ते बीडमध्ये क्षीरसागर यांनी केलेला विकास बॅटरीटॉर्च च्या माध्यमातून शोधत आहेत. गेली पन्नास वर्ष क्षीरसागरानी सत्ता उपभोगली बीडकरांना मोठमोठी आश्वासने दिली मात्र त्याची पूर्तता केली नाही. दररोज उठून कोणते ना कोणते क्षीरसागर तीन दिवसाला बीडकारांना पाणी मिळणार अशी घोषणा करत होते. त्याचे काय झाले असा जळजळीत सवाल यावेळी डॉ. ज्योती मेटे यांनी विचारला. बीडमध्ये अनेक रस्ते खाऊन टाकण्याचं काम करण्यात आलं रस्त्याची आजही बीड शहरात दुरावस्था आहे. घाणीचे साम्राज्य आहे याला जबाबदार फक्त आणि फक्त क्षीरसागरच आहेत. असेही त्या यावेळी म्हणाल्या या प्रसंगी शिवसंग्रामच्या महिला आघाडीच्या कार्यकर्त्या, महिला ,कार्यकर्ते ,पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कुटूंबाच्या पलिकेडे जयदत्त क्षीरसागर यांनीकधीच विचार केला नाही- प्रा. सुरेश नवले



बीड, प्रतिनिधी- काल रोजी जयदत्त क्षीरसागर यांनी विधानसभा निवडणुकीच्या आईन टप्प्यात स्वतःचा पुतण्या योगेश क्षीरसागर यास पाठिंबा देत त्यांना विधानसभा निवडणुकीत निवडून आणा असे आवाहन केले. बीड विधानसभा मतदार संघ हा आपल्या कुटूंबाच्याच ताब्यात राहिला पाहिजे असाच प्रयत्न जयदत्त क्षीरसागरांचा राहिला आहे. गत 2019 विधानसभा निवडणुकीमध्ये जयदत्त क्षीरसागर शिवसेनेचे उमेदवार होते. त्यावेळी अनिल जगताप यांनी त्यांचा प्रचार केला होता. खरं तर थोडी जरी त्यांना उपकारांची जाणीव असती तर त्यांनी अनिल जगतापांना पाठिंबा दिला असता परंतू आयुष्यभर त्यांनी बहुजनांचा द्वेषच केलेला आहे. जातीच्या पलिकडे त्यांची उडी जाऊच शकत नाही असे ते जातिवंत जातियवादी आहेत. चार वेळा बहुजनांनी जयदत्त क्षीरसागर यांना विधानसभेत पाठविले याचा विसर त्यांना पडलेला दिसतोय. कुटूंबाच्या पलिकडे सत्ता जाता कामा नये हीच यांची प्रवृत्ती आहे. हाच अनुभव बीडकर पुन्हा एकदा घेत आहेत. यांना धडा शिकविण्याची हीच योग्य वेळ आहे. असे माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी म्हंटले आहे. ०००००

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com